# MAHARASHTRA STATE COUNCIL OF EXAMINATION, PUNE

Government Commercial Certificate Examination

**5 JULY, 2018**

[Time : 14-00]

(Total Marks for Sections I and II : 100)

**MARATHI TYPEWRITING**

(30 Words Per Minute)

**SECTION - II**

(Time Allowed : 7 Minutes)

**मराठी टंकलेखन**

(३० शब्द प्रति मिनिट)

**विभाग - २**

(वेळ : ७ मिनिटे)

**सूचना :** गती उतारा एकदा टंकलिखित झाल्यावर पुन्हा तोच उतारा टंकलिखित करु नये. खालील मजकूर डाव्या बाजूस १५ पदे समास सोडून द्विपंक्ती अंतराने टंकलिखित करा.

---

**[गुण : ४०]**

आज एकविसाव्या शतकात विज्ञान आणि तंत्रज्ञानाने भरधाव प्रगती केली असली तरीही एका गोष्टीचे महत्त्व जराही कमी झालेले नाही, ती गोष्ट म्हणजे देवालये आणि मंदिरे यांच्यावरील श्रद्धा. ह्याची प्रचिती श्रावण महिन्यात मोठ्या प्रमाणांत येते. श्रावण महिना हा ईश्वराची उपासना करण्यासाठी अतिशय योग्य असा महिना मानला जातो. या महिन्यात व्रते, वैकल्ये, सण, उत्सव मोठ्या प्रमाणावर केले जात असून मानवाच्या कल्याणासाठी असलेल्या निसर्गाच्या विविध घटकांची पूजा करुन त्यांच्याविषयी आदर व्यक्त केला जातो. राम, हनुमान, श्रीकृष्ण या महापुरुषांची जयंतीही साजरी केली जाते. अशा महापुरुषांच्या आदर्श जीवन कार्याची उजळणी करताना आपल्या विचारांना व कार्याला योग्य विचारांचे वळणं मिळते.

दक्षिण भारतीय मंदिरातील उंच उंच भव्य गोपुर, शेकडो दिव्यांची रोषणाई, त्याच्या जोडीला तिथे सुरु असलेले मंत्रोच्चार हे संपूर्ण वातावरण मंगलमय करतात. आपणांस मोहित करतात. तिरूपतीजवळील महालक्ष्मी देवीच्या वेल्लोर मंदिराच्या आवारात प्रवेश केल्यानंतर तेथील रम्य, अतिसुंदर परिसर पाहिल्यानंतर आपण भारताच्या बाहेर आहोत की काय असा भास होतो. व विचारांना योग्य वळण लागते.